UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Special Issue

Issue I, Vol II 10th February 2018

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

Scanned with CamScanner

ISSN : 2319 – 8648 CURRENT GLOBAL REVIEWER Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue-I, Vol II , 10th Feb. 2018

मराठवाडा आणि आदिवासी मन्नेवारलू जमात

प्रितम धोंडिबा टिकळ
संशोधक , डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
प्रा.डॉ.लक्ष्मीकांत जिरेवाड
मार्गदर्शक , आर. बी.अट्टल महाविद्यालय, गेवराई, जि.बीड.

----------(10)----------

प्रस्तावना :

आदिवासी मन्नेवारलू जमात मुळात हा समाज डोंगराळ व आदिवासी भागात राहतो. आदिवासी बद्दल बिरसा मुंडा म्हणतात. वनवासी नाही आदिवासी आहे. या देशाचे मुलनिवासी. डॉ व्हेरियन इल्विन आणि ठक्कर बाप्पा यांनी आदिवासीनां Aboriginal असे संबोधले आहे याचा अर्थ मुळचे रहिवासी असा होतो. प्रामुख्याने मन्नेरवारलू जमात ही द्रविडियन आहे. मुळ भाषा तेलगु असून विजयनगर भागात दुष्काळ पडल्याकारणाने तेथील काही लोकांचा समूह पोट भरण्यासाठी महाराष्ट्रात आला तो तेलगु भाषा बोलणारा वेगळा समाज ओळखु लागला. तेलगु भाषेत मुडु म्हणजे तीन तर नडु म्हणजे डोंभर असा अर्थ होता. आणि मुन्नरु याचा अर्थ तेलगु भाषेत तीनशे असा होतो.३०० लोकांचा वेगळा आदिवासी समाज महाराष्ट्रात उपजिवीकेच्या निमित्ताने अठराव्याशतकात स्थायिक झाला, तीनशे मन्नेरवारलू लोकांच्या समुहातून जी संतती जन्माला आली, जो मोठा समुदाय निर्माण झाला, तोच समुदाय म्हणजे मन्नेरवारलू जमात होय. अशी स्थायिक जमात महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये दुर्लक्षित आढळून येतो.

भारतामध्ये पुर्वीपासून भारतीय समाजात मोठ्या प्रमाणात असमानता होती.ती कमी करण्यासाठी विविध महामानवांनी कार्य केले त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, बिरसा मुंडा, यांचा समावेश होतो.भारतीय संविधाना नुसार ही कलम ३४०, ३४१, ३४२ नुसार उपेक्षित समाजास समतेसाठी आरक्षणची तरतुद केली आहे. परंतु काहीना यामध्येही संघर्ष करावा लागतो.त्यामध्ये मन्नेरवारलू या जमातीचा समावेश आहे. भारतीय संविधान नुसार कलम ३४२(१) नुसार ज्यांचा समावेश अनुसुचित जमातीच्या यादित केला आहे. त्यांना अनुसुचित जमात म्हणतात. मन्नेरवारलू समाजालाही अनुसूचित जमात म्हणून अनुसूचित जमातीच्या यादीत परिशिष्ट १० मध्ये भाग क्र २७ प्रमाणे कोलाम व मन्नेरवारलू जमातीचा अधिकृत रित्या समावेश केलेला आहे.

महाराष्ट्रामध्ये ही जमात अनुसुचित जमातीपैकी सर्वात अल्पसंख्यक आहे ती मराठवाड्यात नांदेड, औरंगाबाद, परभणी, जालना, हिंगोली भागात यांची वस्ती आढळून येते. भारतीय संविधानाप्रमाणे मन्नेरवारलू ही अनुसूचित जमातीपैकी एक असून असून घटनेने या जमातीला इतर आदिवासी जमाती प्रमाणे दिलेले अधिकार व इतर जमाती प्रमाणे आदिवासी म्हणून (Sechdule Tribe) समावेश केला आहे. मन्नेरवारलू जमात अज्ञान अशिक्षित आहे. जमातीस जात पडताळणी समिती कागदपत्रा अभावी जात पडताळणी समितीस मोठ्या प्रमाणात वेळ घेउन ही प्रमाणपत्र नाकारले हे वास्तव आढळले. संशोधक संशोधनाच्या माध्यमातून जात पडताळणी समिती, छाननी, कागदपत्रे, यांच्यावर प्रकाश टाकणार आहे.१९७६(१०६/१९७६) या कायद्यातील तरतुदी प्रमाणे कोलाम, मन्नेरवारलू जमातीचे स्थळविषयक बंधन रद्द करण्यात आले व ही जमात महाराष्ट्र राज्यामध्ये जेथे असेल तेथे जमात विषयक कायदे व सवलती घेण्यास पात्र आहे. भारतीय लोकशाही ही न्यायाधिष्ठित समाज व्यवस्था निर्माण करणारी असुन त्यातून देशातील सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट व्हावी व समतेवर आधारित समाज निर्माण व्हावा अशी अपेक्षा घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बाळगली आहे. भारतीय घटनेने आरक्षणची तरतुद केली आहे.१९८०च्या तरतुदीनुसार जात पडताळणी समिती महाराष्ट्रात स्थापन करण्याचा कायदा करण्यात आला आहे.तदनंतर २०००व २००३ च्या अधिनियमानुसार अनुसूचित जमातीसाठी औरंगाबाद जात पडताळणी समिती स्थापन करण्यात आली. परंतु आजही अनुसूचित जमाती प्रमाणपत्र मिळवून अनुसूचित जमातीचा लाभ इतर लोकांकडून घेताना दिसतो. परंतु जे मुळ आदिवासी आहेत त्यांना मोठ्या प्रमाणात अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.त्यापैकी मन्नेरवारलू जमात एक होय.

संशोधनाची उद्दिष्टे

१. आदिवासी मन्नेवारलू जमातीच्या ऐतिहासिक पार्श्वभुमीचा अभ्यास करणे.

Scanned with CamScanner

२. स्थायी असलेल्या मन्नेरवारलू जमातीची सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

३. मन्नेरवारलू जमातीचा सबाल्टर्न स्टडीच्या दृष्टीकोनातुन संशोधन करणे.

समारोप :

वरील स्वरुपामध्ये मराठवाड्यात या जमातीची वस्ती आढळते. आणि यासाठी या समाजाला मोठा संघर्ष करावा लागतो.त्याचे प्रश्न, समस्या मोठ्या प्रमाणात आहेत

संदर्भ सूची

१. संगवे, विलास, आ, आदिवासीचे सामाजिक जीवन, पॉप्युलर प्रकाशन ,मुंबई ,१९७२.

२. मेश्राम, गोकुळदास, आदिवासी संस्कृतीचे वारसदार व त्यांचा धम्म, सुगावा प्रकाशन, पुणे ,२००६.

३. डॉ.,पिपळे, भिमराव, वनवासी अपेक्षित जग, अभिनव जीवन प्रकाशन, बीड, १९९०.

४. नाडगौडे, गुरुनाथ, भारतीय आदिवासी, कॉन्टिटिनेन्टल प्रकाशन, पुणे १९७९.

५. ताम्हणकर, श्री. ग, भारतीय शासन पध्दती, विश्वभारती प्रकाशन, नागपुर, १९७२.

६. डॉ. गारे गोविंद, आदिवासीचे प्रश्न आणि परिवर्तन, अमृत प्रकाशन, औरंगाबाद, १९९४.

७. महाराष्ट्र शासन नागरी सनद, आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र राज्य शासन मंत्रालय, मुंबई.

Scanned with CamScanner